# ECHO OF HIS CALL

ECHO OF HIS CALL
REACHING NATIONS
SINCE 1969
1969 TO 2029

## बोलाविण्याचा प्रतिध्वनी

MARATHI

India's National Spiritual Newspaper

₹ 10/-

Published monthly in ENGLISH, TAMIL, MALAYALAM, TELUGU, HINDI, KANNADA, MARATHI, BENGALI, GUJARATI, ODIYA, ASSAMESE, PUNJABI, NEPALI, URDU, SINHALA & AFRIKAN

Editor : S. SAM SELVA RAJ | 16 Languages | Associate Editor : Rev. SHAUL BENJAMIN SHINDE

VOL: XXVII YEAR OF OUR LORD JESUS CHRIST, 2025 NOVEMBER No. 10


### पवित्र शास्त्र

कृपया हा शास्त्र भाग पाठ करा

**स्तोत्रसंहिता ९६:७-१३**

७. अहो मानवकुलांनो, परमेश्वराचे गौरव करा; परमेश्वराचे गौरव करा व त्याचे सामर्थ्य वाखाणा.

८. परमेश्वराच्या नावाची थोरवी गा; अर्पण घेऊन त्याच्या अंगणात या;

९. पवित्रतेच्या शोभेने परमेश्वराची उपासना करा; हे सर्व पृथ्वी त्याच्यापुढे कंपायमान हो.

१०. राष्ट्रांमधील लोकांना विदित करा की, परमेश्वर राज्य करतो. जग स्थिर स्थापलेले आहे, ते डळमळणार नाही. तो सरळपणे लोकांचा न्याय करील.

११. आकाश हर्ष करो, पृथ्वी उल्लास करो, समुद्र व त्यांतील सर्व काही गर्जना करोत;

१२. शेत व त्यांतील सर्व काही उत्सव करोत; मग वनांतील सर्व झाडे परमेश्वरासमोर आनंदाचा गजर करतील;

१३. कारण तो आला आहे; पृथ्वीचा न्याय करायला तो आला आहे; तो न्यायीपणाने जगाचा व सत्यतेने लोकांचा न्याय करील.

## तुम्ही जागे आहात का झोपला आहात?

### ARE YOU AWAKE OR ASLEEP?

*- सिस्टर एंजल*



आपला प्रभू आणि तारणहार येशू ख्रिस्ताच्या पुनरुत्थित नावाने मी तुम्हाला शुभेच्छा देते, ज्याने आपल्याला स्वर्गीय राज्यातून प्रत्येक आध्यात्मिक आशीर्वाद दिला आहे. या मासिकाच्या माध्यमातून आमच्या **एको ऑफ हिज कॉल** या विस्तारित कुटुंबाशी जोडणे माझ्यासाठी नेहमीच आनंददायी असते. माझी प्रार्थना आहे की, तुम्ही तुमच्या जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात समृद्ध व्हावे, जसे तुमचा आत्मा ख्रिस्त- येशूमध्ये समृद्ध होतो.

आपण आता वर्ष २०२५ च्या अखेरीस पोहोचत आहोत. हे वर्ष किती लवकर निघून गेले! मागे वळून पाहताना विचार करण्यासारखे बरेच काही आहे. ज्यांनी वर्ष फलदायी आणि आशीर्वादित असे अनुभवले आहे त्यांच्यासाठी मी देवाचे आभार मानते आणि ज्यांनी आव्हानांना तोंड दिले आहे त्यांच्यासाठी मी प्रार्थना करते - तुमच्या चिकाटीबद्दल आणि तुम्ही इथपर्यंत पोहोचल्याबद्दल शुभेच्छा. खरोखर, देव आपले सामर्थ्य आहे!

आमच्या कुटुंबासाठी हे वर्ष विशेषतः आव्हानात्मक होते. माझ्या भावाचे, जो माझ्या आई-वडिलांचा लाडका होता व ख्रिस्ताचा विश्वासू सेवक होता, निधन झाले याचा कटू अनुभव आम्ही घेतला. तरीही, या सर्व परिस्थितीमध्ये, देवाची कृपा आपल्यासाठी पुरेशी आहे. या कठीण काळात तुम्ही केलेल्या प्रार्थनांबद्दल आणि आमच्यासोबत उभे राहिल्याबद्दल मी मनापासून आभारी आहे.

(...पान ३ वर)




**एको ऑफ हिज कॉल**

*यू ट्युब ख्रिश्चन चॅनल !*

पास्टर सॅम सेल्वा राज **यांच्या सोबत प्रार्थनेत**

**सहभागी होण्याची संधी**

***पाच मिनिटांचा संदेश***

इंग्रजी, हिन्दी, तमिळ आणि तेलगु

प्रतिदिनी - पहाटे २.०० वाजल्या पासून

रविवारची तमिळ भक्ति - ८.३० सकाळी

✲ कृपा करुन सबक्राईब करा ✲

ECHO OF HIS CALL REACHING NATIONS SINCE 1969

1969 TO 2029

ECHO OF HIS CALL - (Marching towards 60th year)
Estd. 1969



# तुमच्या अतिप्रिय बंधु कडून...

''अहो यहोवाची आशा धरणाऱ्या सर्वांनो, तुम्ही सबल व्हा, आणि तुमचे हृदय धैर्य धरो''- स्तोत्र ३१:२४.



### आमचे कार्याविषयीचे धोरण

आम्ही समकालीन पीढीला पुरातन आणि आरंभीच्या प्रेषितांची शिकवण तीची प्रखरता कमी न करता स्पष्ट करावी आणि शिकवावी ही काळाची गरज आहे.

HON. EDITOR-IN-CHIEF
Rev. Dr. Angeline S. Kumari, M.A., M.Sc., M.Ed.
EX MANAGING EDITOR
Pastor Alex Samson Sam, B.Th., M.Div.
GENERAL MANAGER
Bro. N. Prakasam, M.A., M.Sc.(C&P), PGDHRM, MBA.
ADMINISTRATION
Sis. Jesy Veena Sam
Adv. K. Puratchivendan, M.Com., C.A., B.L.
Dr. P.E.R. Premchand, M.Sc., M.A., M.Ed., Ph.D.
Dr. C.G.S. Baburao, B.Tech., M.Tech. (DM), Ph.D.
Dr. Rabinder Boaz, M.S. (CMC)
EDITORIAL BOARD
Dr. Serena Bevin, M.A., M.Phil., B.Ed.
Sis. Sajini Cherian
Rev. Dr. K.R. Rajasekaran
Rev. Dr. William Robert, Ph.D., DD, D.Lit.

EDITOR, PUBLISHER & PRINTER
Pastor S. SAM SELVA RAJ
Echo of His Call Printers
10, Mohammed Abdullah 2nd Street,
Chepauk, Chennai- 600 005, India.
Phone : (+ 91- 44) 2852 8282, 2852 9293, 2854 7766
Cell : (+91) 98410 71852, 98412 71858 95661 31858
E.MAIL
sam@echoofhiscall.org
biblecor@yahoo.co.in
WEBSITES
www.echoofhiscall.org
www.stpaulsmatriculation.org
YOUTUBE CHANNEL
Echo of His Call



ख्रिस्तातील प्रिय बंधू आणि बहिणींनो,

आपल्या प्रभू येशू ख्रिस्ताच्या मौल्यवान नावाला गौरव आणि सन्मान असो, जो आपल्याला आशीर्वादाच्या मार्गावर नेत राहतो.

गेल्या महिन्यात, आम्हाला अनेक आव्हानांचा सामना करावा लागला, जसे छपाई यंत्रांमधील तांत्रिक समस्या, आमच्या सहकाऱ्यांमधल्या आरोग्य समस्या आणि इतर तातडीच्या गरजा, ज्यामुळे कधीकधी सेवाकार्य मंदावल्याचे दिसून आले. तरीही, देवाने त्याच्या पराक्रमी हाताने प्रत्येक परीक्षेचे त्याच्या गौरवाने साक्षीत रूपांतरित केले. आज, आम्ही हे काम नव्या जोमाने आणि नव्या उत्साहाने सुरू ठेवतो.

ज्यांनी विश्वासपूर्वक परिश्रम घेतले आहेत अशा सर्वांना तुमच्या उत्कट प्रार्थनांच्याद्वारे प्रभूच्या दैवी सामर्थ्याचा स्पर्श व्हावा अशी आम्ही मनापासून अपेक्षा करतो: आमचे समर्पित मंडळीतले सेवक, क्षेत्रीय कामगार, प्रिंटिंग प्रेस मधील कर्मचारी, कार्यालयीन टीम, **नेहेम्या बायबल कॉलेजचे कर्मचारी** तसेच **सेंट पॉल मॅट्रिक्युलेशन स्कूलचे** शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी.

सध्या आम्हाला समर्पित कामगारांच्या कमतरतेचा सामना करावा लागत आहे, ज्यामुळे अनेक क्षेत्रांमध्ये विलंब होत आहे, जसे की, आमच्या वरिष्ठ पाळकांच्या आत्मचरित्राचे पूर्ण करण्याचे काम, निवासी हिंदी नहेम्या बायबल कॉलेजची वाढ, विविध प्रशासकीय जबाबदाऱ्या आणि एकूणच मंडळीच्या प्रगतीचे कार्य. निवृत्त सरकारी अधिकारी आणि वचनबद्ध पूर्णवेळ सेवकांनी या सेवेचा भार वाटून घेण्यासाठी पुढे यावे याविषयी तुम्ही प्रार्थना करावी अशी आम्ही विनंती करतो.

या काळात, जेव्हा अनेक सेवाकार्ये देवाच्या वचनातील मूलभूत सत्यांपासून दूर जात आहेत आणि सांसारिक पद्धती व व्यवस्थांकडे झुकत आहेत, अशा वेळी प्रभू आम्हांवर कृपा करो, व त्याच्या आत्म्याने नव्याने आम्हांवर वर्षाव करो, तसेच आपल्या गौरवासाठी आम्हा सर्वांना एकत्र येऊन सेवा करण्यास एकजूट करो.

आम्ही तुम्हाला विनंती करतो की, तुम्ही सर्व सेवाकार्यांना आणि सेवकांना प्रार्थनेत उचलून धरावे, जे आत्मिक रणांगणाच्या आघाडीवर उभे असतात आणि तुमच्यासाठी शत्रूच्या बळकट किल्ल्यांविरुद्ध लढत असतात.

येशू ख्रिस्तातील तुमचा सेवक,

पास्टर एस्. सॅम सेल्व राज, E.mail : sam@echoofhiscall.org

Our Ministries: ▫ ECHO OF HIS CALL Monthly Magazines (16 languages) ▫ BIBLECOR - Postal Courses (3 languages) ▫ YouTube Ministry ▫ Online Courses ▫ Theological Correspondence Courses (2 languages) ▫ Church Planting ▫ Nehemiah Bible Colleges ▫ Gospel Printing Press ▫ Great Commission Partners ▫ St. Paul's Matriculation School ▫ Crusades ▫ Community Development

(पान १ वरून...)

गेल्या महिन्यात आपल्या हृदयाचे रक्षण करण्याच्या महत्त्वपूर्ण विषयाबद्दल मी लिहिले होते, जेणेकरून आपण देवाचे आशीर्वाद प्राप्त करू शकू. रक्षण



*देवाने आपल्याला आपल्या कुटुंबावर, आपल्या मंडळींवर, आपल्या शहरांवर आणि आपल्या राष्ट्रांवर पहारेकरी म्हणून नेमले आहे.*

या शब्दावर मी मनन करीत असताना, मला आठवले की, देवाने आपल्यापैकी प्रत्येकाला त्याने सोपवलेल्या गोष्टींचे रक्षक किंवा पहारेकरी म्हणून कसे बोलावले आहे. यहेज्केल ३:१७ मध्ये आपण वाचतो: **"मनुष्याच्या मुला, मी तुला इस्राएलाच्या घराण्याचा पहारेकरी केले आहे,......"** देवाने आपल्याला आपल्या कुटुंबांवर, आपल्या मंडळींवर, आपल्या शहरांवर आणि आपल्या राष्ट्रांवर पहारेकरी म्हणून नेमले आहे.

एक पहारेकरी गप्प राहू शकत नाही. देवाचे वचन सांगते की, **"हे यरुशलेमे, मी तुझ्या कोटावर पहारेकरी ठेवले आहेत, ते दिवसा किंवा रात्री कधी उगे राहणार नाहीत; जे तुम्ही यहोवाला स्मरण देणारे ते तुम्ही स्वस्थ राहू नका"** - यशया ६२:६. येशू ख्रिस्त लवकरच येत आहे; आपण गप्प बसू शकत नाही!

एका विश्वासू पहारेकऱ्याने सतर्क राहिले पाहिजे; धोक्याचा अगदी हलकासा आवाजही तो पाहू शकणारा, ऐकू शकणारा आणि ओळखू शकणारा असावा. आपल्याला सावध राहण्यास, आध्यात्मिकरित्या जागृत राहण्यास आणि पुढे संकट आल्यावर धोक्याची सूचना देण्यास पाचारण केलेले आहे. सावध रहा! जागरूक रहा! येणाऱ्या गोष्टींबद्दल इतरांना प्रामाणिकपणे सावध आणि तयार करण्याचे काम आपण करूया.

यहेज्केल ३३:६ आपल्याला चेतावणी देते की, **"पहारेकरी तरवार येताना पाहून जर कर्णा वाजवणार नाही व लोकांना इशारा करणार नाही......... मी त्याचे रक्त पहारेकऱ्यापासून मागून घेईन."** यिर्मया ५१:१२ हे वचन आपल्याला असे करण्यास प्रोत्साहित करते की, **"पहारा बळकट करा, पहारेकरी ठेवा...."**

ही जबाबदारी केवळ इतरांना इशारा देण्याची नाही, तर ती आपल्या स्वतःच्या जीवनाचे रक्षण करण्यासंबंधी देखील लागू होते. देवाच्या योजनेपासून आणि उद्देशापासून आपल्याला दूर नेणारे असंख्य अडथळे आणि प्रलोभने आहेत. जर आपण जागरूक राहिलो नाही तर आपण सहज पडू शकतो. सर्व विश्वासी स्त्री- पुरुषांना पहारेकरी म्हणून पाचारण करण्यात आले आहे!

पण इथे महत्त्वाचा प्रश्न हा आहे की, देवाने आपल्याला रक्षण करण्यासाठी पाचारण केले आहे तसे आपण खरोखरच रक्षण करीत आहोत का?

विश्वासू पहारेकऱ्याचे मुख्य गुण म्हणजे सावध असणे, जागृत असणे आणि सचेत असणे.

सावध असणे म्हणजे अगदी लहानात लहान बदल किंवा हालचालींबद्दलही जागरूक असणे.

सचेत असणे म्हणजे आपण ज्या क्षेत्राचे रक्षण करीत आहोत त्या क्षेत्राचे



*आपल्या सभोवताली घडणाऱ्या गोष्टींबद्दल आपण सावध किंवा सचेत राहिले पाहिजे.*

ज्ञान असणे; त्या क्षेत्रांच्या बलस्थानांचा, कमकुवत ठिकाणांचा आणि संभाव्य धोके असलेल्या ठिकाणांचा परिचय असणे.

जागृत राहणे हे कदाचित सर्वात महत्त्वाचे आहे, कारण आपण जागृत नसल्यास, आपण जे काही आपल्या सभोवताल घडत आहे त्याबद्दल सावध किंवा सचेत राहू शकत नाही.

या शेवटच्या काळात, देव आपल्याला आत्मिकरीत्या सावध, जागरूक आणि सचेत राहण्याचे आवाहन करीत आहे.

## १. पण झोपणारे कोण आहेत?



येशू ख्रिस्त आपल्याला मत्तय १३:१५ मध्ये उत्तर देतो: **"कारण या लोकांचे**

## अत्यंत महत्त्वाची सुचना!




नजीकच्या भविष्यात **एको ऑफ हिज कॉल**च्या पोस्टल डिस्पॅचमध्ये अपरिहार्य व्यत्यय येऊ शकतात. जर आपल्याला कोणताही व्यत्यय न येता **एको ऑफ हिज कॉल** प्राप्त करणे सुरू ठेवायचे असेल तर कृपया आम्हाला आपले नाव, पत्ता, ईमेल आणि व्हॉटस एप नंबर याची माहिती पत्राद्वारे, ईमेल, फोन कॉल किंवा एस एम एस/व्हॉटस एप संदेशाद्वारे तातडतोब पाठवा.

तुमच्या पाठिंब्यामुळे आम्हाला तुमची चांगली सेवा करण्यास मदत होते!

**आमचा पत्ता:**

**एको ऑफ हीज कॉल**
**१०, मोहम्मद अब्दुल्ला २ री गल्ली, चेपॉक, चेन्नई-६००००५, भारत**
**Cell: (+91) 98412 71858 / 98410 71858 E.mail: sam@echoofhiscall.org**

**अंतःकरण जड झाले आहे, आणि त्यांनी आपल्या कानांनी मंद ऐकले आहे आणि त्यांनी आपले डोळे मिटले आहेत.....''**

दुसऱ्या शब्दांत सांगायचे तर, हे असे लोक आहेत, ज्यांची अंतःकरणे कठोर झाली आहेत. त्यांनी प्रेम, आशा आणि नीतिमत्तेचा संदेश ऐकला आहे, तरीही ते त्यांचे मार्ग बदलण्यास नकार देतात. स्पष्टीकरणात्मक पवित्र शास्त्र असे म्हणते, **''त्यांनी आपले डोळे मिटले आहेत.''** ते पाहण्यास इच्छुक नाहीत.

येशू ख्रिस्ताने अशा लोकांचे वर्णन असे केले आहे की, ''...........**आपल्या ओठांनी माझा मान करतात, परंतु त्यांनी आपले हृदय माझ्यापासून दूर केले आहे.''**

जर आपले हृदय देवाचा आवाज ऐकण्यास इच्छुक नसेल, तर आपण आत्मिकरीत्या झोपलेले आहोत. जर




*आपले हृदय देवाचा आवाज ऐकण्यास इच्छुक असावे.*

आपल्याला देव काय म्हणतोय ते ऐकू येत नसेल, जर आपल्याला देवाच्या गोष्टी दिसत नसतील, तर आपण आत्मिकरीत्या झोपलेले व असुरक्षित आहोत.

## २. आपण जेव्हा झोपलेले असतो तेव्हा काय होते?

मत्तय १३व्या अध्यायात आपण एक प्रभावी दाखला वाचतो - एक जमीनदाराने आपल्या शेतात चांगले बी पेरले आणि ते सुरक्षित राखण्यासाठी आपल्या सेवकांच्या हाती सोपवले. पण पहारेकरी झोपलेले असताना, शत्रू शांतपणे आला, त्याने गव्हात निदण पेरले आणि कोणाच्या



*पहारेकरी झोपलेले असताना शत्रू शांतपणे आला व त्याने गव्हात निदण पेरले.*

लक्षात येण्याआधीच तो निघून गेला. नंतर पाट फुटली व दाणे आले तेव्हा निदणही दिसू लागले.

**''परंतु माणसे झोपेत असताना त्याचा वैरी आला, आणि गव्हामध्ये निदण पेरून गेला''** - मत्तय १३:२५.

## ३. झोपेत असताना शत्रू आला!

चला, या वचनावर खोलवर चिंतन करूया: **ते झोपेत असताना, वैरी आला!**

रात्रीच्या शांततेत कोण आत आला?
**- वैरी.**

पहारेकरी म्हणून, आपण जागृत आणि सावध राहणे अपेक्षित आहे. ज्या क्षणी आपण आत्मिकदृष्ट्या झोपी जातो, त्या क्षणी आपली जागरूकता आपण हरवून बसतो, आणि मग शत्रू आपल्या बेसावध असण्याचा फायदा घेतो.

**म्हणूनच पवित्र शास्त्र आपल्याला वारंवार आग्रहाने सांगते:**

**''जागे राहा व प्रार्थना करा......''** - मत्तय २६:४१

**''खोट्या भविष्यवाद्यांविषयी सावध असा;.....''** - मत्तय ७:१५

**''....तुम्ही सावध असा, आणि सर्व प्रकारच्या लोभापासून आपणांला राखा,.....''** - लूक १२:१५

**''प्रार्थनेत टिकून राहा आणि उपकारस्तुती करीत तीत जागे राहा''** - कलस्सै ४:२

**''म्हणून जागे राहा,.....''** - मत्तय २४:४२

या सर्व वचनांमध्ये, जागृत आणि सावध राहण्याच्या गरजेवर भर देण्यात आला आहे. तरीही या दाखल्यामध्ये, नोकर झोपी गेले आणि तेव्हाच शत्रू आला.

प्रिय मित्रांनो, जेव्हा आपण बेसावध, विचलित किंवा आत्मिकदृष्ट्या झोपलेले असतो, तेव्हा शत्रू नेहमीच हल्ला करण्याची संधी शोधत असतो. तो आपल्याला अडखळवण्यासाठी आणि आपल्याला पाडण्यासाठी योग्य क्षणाची वाट पाहत गर्जना करणाऱ्या सिंहासारखा फिरत असतो. आणि म्हणूनच आपल्याला दक्ष राहणे आवश्यक आहे.

आपण आत्मिकरीत्या जागृत आणि देवाच्या आवाजाबद्दल संवेदनशील कसे राहू शकतो? त्याच्याशी जवळीक आणि सातत्यपूर्ण वाटचाल राखून. आपले प्रभू सोबतचे नाते जर तात्पुरते असेल किंवा मनापासून नसेल, तर आपण स्वतःचे, आपल्या कुटुंबाचे, आपल्या मंडळीचे,



*त्याच्याशी जवळचा आणि सातत्यपूर्ण संबंध ठेवणे.*

आपल्या शहराचे किंवा आपल्या राष्ट्राचे रक्षण करू शकत नाही.

## ४. ''मध्ये'' हा शब्द!

या दाखल्यातील आणखी एक उल्लेखनीय नोंद म्हणजे ''मध्ये'' हा शब्द. शत्रूने निदण कुठे पेरले? फार दूर नाही, दुसऱ्या शेतात नाही, तर चांगल्या बीमध्ये. शत्रूला नेमके माहित असते की, त्याने

(...पान ६ वर)

GREAT COMMISSION PARTNERS
ECHO OF HIS CALL MINISTRIES SINCE 1969

# महान सेवाकार्याचे भागीदार प्रार्थना विनंत्या

स्तुती आणि प्रार्थनेचे विषय - १९ नोव्हेंबर, २०२५ पासून ते १८ डिसेंबर, २०२५

ओझी वाहणे (गलती ६:२),
गरजा भागविणे (रोम १२:१३),
आणि कार्यास गती देणे (२ तिमथी १:६)

**(कृपया हे पान बाजूला काढून, सतत प्रार्थना करण्याकरिता तुमच्या पवित्र शास्त्रात ठेवा)**

## याकरीता देवाची स्तुती करा...

**१९ नोव्हेंबर -** आपले सर्व विविध कार्य सुरक्षित ठेवण्यामध्ये त्याने आशीर्वादित केले यासाठी त्याची स्तुती करा.

**२० नोव्हेंबर -** त्याचा आपल्याबद्दलचा असलेला स्नेह व अढळ प्रेम यासाठी देवाची स्तुती करा.

**२१ नोव्हेंबर -** आमच्या स्वतःच्या प्रिंटिंग प्रेसद्वारे १६ भाषांमध्ये आमचे मासिक छापून प्रकाशित करण्यास आणि ते मिशन क्षेत्रात पाठवण्यास आम्हाला सक्षम केले यासाठी देवाची स्तुती करा.

**२२ नोव्हेंबर -** मागील महिन्यात लाभलेल्या त्याच्या कृपापूर्ण मार्गदर्शनासाठी देवाची स्तुती करा.

**२३ नोव्हेंबर -** वेगवेगळ्या भागांत जाऊन मिशनरी सेवा करणाऱ्यांना आणि त्यांच्या कुटुंबियांना आशीर्वादित केले यासाठी देवाची स्तुती करा.

**२४ नोव्हेंबर -** आमच्या मंडळीच्या सेवाकार्यात नव्या विश्वासूंना देवाने सामील केले यासाठी देवाची स्तुती करा.

**२५ नोव्हेंबर -** आमच्या सर्व कर्मचाऱ्यांना आणि त्यांच्या कुटुंबियांना देवाने आशीर्वादित केले यासाठी देवाची स्तुती करा.

**२६ नोव्हेंबर -** आमचे वरिष्ठ पाळक, जे विविध सेवाकार्यातून सुसमाचार पसरविण्यास वचनबद्ध आहेत यासाठी देवाची स्तुती करा.

**२७ नोव्हेंबर -** **एको ऑफ हिज कॉल मिनिस्ट्रीजच्या** प्रत्येक कार्यामध्ये देवाचे लाभलेले मार्गदर्शन आणि आशीर्वाद यासाठी देवाची स्तुती करा.

**२८ नोव्हेंबर -** आमची मुख्य मंडळी आणि तिच्या शाखांसाठी संडे स्कूल मध्ये अधिक मुले देऊन आम्हाला आशीर्वादित केले यासाठी देवाची स्तुती करा.

**२९ नोव्हेंबर -** आमच्या यूट्यूबच्या सेवेद्वारे जिथे सुवार्ता पोहोचलेली नाही, तिथे ती पोहचवण्यास देव आम्हाला करीत असलेल्या मदतीसाठी देवाची स्तुती करा.

**३० नोव्हेंबर -** आमचे प्रार्थनेतील सहभागीदार, सदस्यता घेणारे सहभागीदार, विश्वासामधील सहभागीदार, जीवनभर सोबत करणारे सहभागीदार, महान सेवाकार्याचे सहभागीदार, आणि त्यांच्या कुटुंबियांवर देवाने केलेल्या आशिर्वादाबद्दल देवाची स्तुती करा.

**०१ डिसेंबर -** आमचे सहकारी संपादक आणि समन्वयक आणि त्यांच्या कुटुंबियांना देवाने दिलेल्या आशीर्वादांबद्दल देवाची स्तुती करा.

**०२ डिसेंबर -** आमच्या रुग्णालय सेवेत देव करीत असलेल्या चमत्कांबद्दल देवाची स्तुती करा.

**०३ डिसेंबर -** समर्पित सहाय्यक संपादक, जे **एको ऑफ हिज कॉल** मासिकाच्या सेवेला विश्वासूपणे पाठिंबा देत आहेत यासाठी देवाची स्तुती करा.

## कृपया यासाठी प्रार्थना करा...

**०४ डिसेंबर -** या पिढीतील युवक आणि मुलांसाठी मध्यस्थी करणाऱ्या आमच्या **ग्लोबल व्हिजन फॉर यूथ अँड किड केअर सेवाकार्यात** अधिक लोक सहभागी होण्यासाठी प्रार्थना करा.

**०५ डिसेंबर -** आमच्या युट्युब मीडिया मिनिस्ट्रीद्वारे असंख्य आत्म्यांचे तारण व्हावे यासाठी प्रार्थना करा.

**०६ डिसेंबर -** आमची मुख्य मंडळी आणि त्याच्या शाखांमधील विश्वासणाऱ्यांना दैवी संरक्षण आणि चांगले आरोग्य लाभावे यासाठी प्रार्थना करा.

**०७ डिसेंबर -** जगभरातील सर्व ख्रिस्ती सेवाकार्यांमध्ये एक उत्तम संजीवनाचे कार्य व्हावे यासाठी प्रार्थना करा.

**०८ डिसेंबर -** आमचे वरिष्ठ पाळक एस. सॅम सेल्वा राज आणि त्यांच्या कुटुंबाचे सर्व वाईट शक्तींपासून संरक्षण व्हावे यासाठी प्रार्थना करा.

**०९ डिसेंबर -** आपल्या सेवाकार्याचा विस्तार आणि सुवार्तेचा जगभरात प्रसार व्हावा यासाठी प्रार्थना करा.

**१० डिसेंबर -** सर्व धर्मांमध्ये एकता आणि सुसंवाद राहण्यासाठी प्रार्थना करा.

**११ डिसेंबर -** जगभरातील चक्रीवादळे आणि भूकंप यासारख्या नैसर्गिक आपत्तींना प्रतिबंध करता यावे यासाठी प्रार्थना करा.

**१२ डिसेंबर -** जगभरातील किशोरवयीन आणि तरुणांमधील आत्महत्येच्या प्रवृत्ती नष्ट होण्यासाठी प्रार्थना करा.

**१३ डिसेंबर -** **सेंट पॉल मॅट्रिक्युलेशन स्कूल** आणि **नहेम्या बायबल कॉलेजमधील** विद्यार्थी आणि शिक्षकांसाठी दैवी संरक्षण मिळावे यासाठी प्रार्थना करा.

**१४ डिसेंबर -** जगभरातील पाळक आणि मिशनऱ्यांना देवाचे संरक्षण मिळावे यासाठी प्रार्थना करा.

**१५ डिसेंबर -** आमची मुख्य मंडळी आणि त्याच्या मंडळींच्या शाखा यामधील सर्व सदस्यांच्या आत्मिक आणि शारीरिक आरोग्यासाठी प्रार्थना करा.

**१६ डिसेंबर -** आमच्या संस्थेसाठी योग्य आणि समर्पित कर्मचाऱ्यांची भरती व्हावी यासाठी प्रार्थना करा.

**१७ डिसेंबर -** आमच्या ऑफिसच्या कर्मचाऱ्यांवर आणि प्रिंटिंग प्रेसच्या टीमवर देवाचा संरक्षणाचा हात असो, तसेच देव त्यांना त्यांच्या कामात सुरक्षित आणि निरोगी ठेवो यासाठी प्रार्थना करा.

**१८ डिसेंबर -** सर्व राष्ट्रांमध्ये एकता आणि शांती स्थापित होवो यासाठी प्रार्थना करा.

(पान ४ वरून)

आपले निदण केव्हा आणि कुठे पेरायचे; देवाने जे पेरले आहे त्याच्या मध्येच, आणि त्याच्या वाढ होण्याच्या काळात.

मला वाटतं तोही दाखल्यातील पेरणाऱ्याच्या वैऱ्याप्रमाणे, योग्य वेळी प्रहार करण्याची वाट पाहत असावा. आपण अनेकदा पाहतो की, निदण बीजांच्या मध्ये उगवतात आणि त्यांचा जीवनरस शोषून त्यांना नष्ट करतात. निदण पोषण कमी करतात, वाढ रोखतात आणि निरोगी वनस्पती नष्ट करतात. ते वणव्यासारखे वेगाने पसरतात.

त्याचप्रमाणे, आपल्या जीवनात आपल्याला कुटुंबातील सदस्यांमध्ये, मंडळीतील सदस्यांमध्ये, मित्रांमध्ये आणि अगदी सेवाकार्यात सहभागी असलेल्यांमध्येही निदण सापडतील. हे निदण आपला आनंद, शांती आणि आरोग्य हिरावून घेण्याचा प्रयत्न करतात आणि खोटेपणा व फसवणुकीद्वारे नातेसंबंध खराब करतात. म्हणूनच आपल्याला सैतानाच्या योजना आणि डावपेच ओळखण्यासाठी




*चोर आपला आनंद, शांती, आणि आरोग्य चोरतो.*

पारख करण्याच्या आत्म्याची आवश्यकता आहे.

जेव्हा जेव्हा येशू ख्रिस्त लोकांमध्ये होता, पवित्र शास्त्रामध्ये लिहिल्याप्रमाणे, तेव्हा तेव्हा तो "त्यांचे विचार जाणून होता" किंवा "त्यांचे दुष्ट विचार जाणून होता." पहारेकरी म्हणून, आपणही आपल्या सभोवतालच्या लोकांपासून सावध असले पाहिजे. येशू ख्रिस्ताने इशारा दिला, **"पाहा, लांडग्यांमध्ये जसे मेंढरांस पाठवावे तसे मी तुम्हांस पाठवीत आहे; म्हणून तुम्ही सापांसारखे चतुर व कबुतरांसारखे गरीब व्हा"** - मत्तय १०:१६.



*सापासारखे धूर्त आणि कबुतरासारखे नम्र व्हा.*

पवित्र आत्मा हाच आपल्याला सर्व सत्यात मार्गदर्शन करतो. म्हणूनच, आपल्या आत वास करणाऱ्या त्याच्या उपस्थितीचे आपण मोल जाणले पाहिजे, आणि त्याच्या मार्गदर्शनावर आपण अवलंबून राहिले पाहिजे. आपण हे समजून घेतले पाहिजे की, चांगल्या लोकांमध्येही काही दुष्ट विचारांचे लोक असतात आणि अनेकदा त्यांना आपल्यापासून वेगळे राहण्यास सांगणे सोपे नसते. बऱ्याचदा, अशा लोकांकडून प्रेमळ, काळजी घेणारे आणि दयाळू लोकांचेच मन दुखावले जाते. म्हणूनच, आपण सावध राहिले पाहिजे. फसू नका. कोणालाही तुमचा गैरफायदा घ्यायला देऊ नका.

## ५. त्यांना वाढू द्या!

त्या दाखल्यातील एक लक्षवेधी गोष्ट म्हणजे, चांगले बी आणि निदण हे दिसायला एकसारखेही असू शकतात. वचन १३:२६ मध्ये आपण वाचतो की, **चांगले बी आणि निदण हे दोन्ही एकत्र वाढू लागले, ते एकत्र दिसू लागले आणि दिसायला ते जवळजवळ सारखेच वाटत होते.** काळ जसजसा सरत गेला, तसतसे ते दोन्ही जवळजवळ सारखेच दिसू लागले. पवित्र शास्त्राचे अभ्यासक हे स्पष्ट करतात की, हे विशिष्ट निदण "डार्नेल" म्हणून ओळखले जाते, जे एक रोपटे आहे, ते त्या बियाणासारखेच दिसते. त्या दोघांमधला फरक आपला गोंधळ उडवणारा आहे.

गोंधळलेल्या चाकरांनी घरधन्याकडे जाऊन विचारले: **"महाराज, तू आपल्या शेतामध्ये चांगले बी पेरले नाही काय? तर त्यात निदण कोठून आले?"** - मत्तय १३:२७. झोपलेल्या चाकरांना आश्चर्य वाटले की, हे निदण कुठून आले. ते एकसारखे वाटत नाही का? आपण देवाला किती वेळा विचारतो, माझ्या आयुष्यात हे का घडले? ते कुठून आले? माझ्यासोबत असे का होत आहे?

(पान ९ वर)

ECHO OF HIS CALL REACHING NATIONS SINCE 1959
नहेम्या बायबल कॉलेजेस
शैक्षणिक पात्रता : १० वी इयत्ता आणि अधिक
चेपॉक आणि संतोषपुरम, वेलाचेरी, चेन्नाई
प्रवेशा करिता त्वरा करा ! माध्यम : तमिळ (अर्धवेळ) हिंदी (निवासी) (स्पोन्सरशिप उपलब्ध)
ईश्वरविद्या डिप्लोमा & Bachelor of Theology
संपर्क : अध्यक्ष : नहेम्या बाईबल कॉलेज
10, MOHAMMED ABDULLAH 2ND STREET, CHEPAUK, CHENNAI - 600 005, INDIA.
Phone : (+91-44) 2852 8282, Cell : (+91) 98410 71852 / 95661 31858
E.mail : sam@echoofhiscall.org / Website : www.echoofhiscall.org
आंतरराष्ट्रिय ख्रिस्ती पुढाऱ्यांद्वारे आणि वरिष्ठ पाळकांद्वारे ५६ वर्षांपासून मान्यता प्राप्त
* ऑनलाईन क्लास उपलब्ध आहे *

## -: आमच्या मुख्यालयातील सेवाकार्या :-

१. प्रार्थना सेवा : २४ तास
२. **एको ऑफ हिज कॉल** : मासिक : इंग्रजी, तामिळ, मल्यालम, तेलगु, हिन्दी, कन्नड, मराठी, गुजराथी, बंगाली, ओरिया, नेपाळी, आसामी, पंजाबी, उर्दु, सिंहली आणि आफ्रिकन
३. **बायबलकोर** : मुळभूत बायबल अभ्यासक्रम (इंग्रजी, तामिळ आणि हिन्दी)
४. पत्रव्यवहाराद्वारे थियॉलॉजीकल अभ्यासक्रम : इंग्रजी आणि तामिळ
५. नहेम्या बायबल कॉलेज : (चेपॉक, संतोषपुरम आणि वेलाचेरी)
६. शाखा चर्च : संतोषपुरम, बालाजी नगर आणि वेलाचेरी
७. महान आज्ञापालनाचे भागीदार : (पाळकांचे नेटवर्क)
८. प्रशिक्षण कार्यक्रम : सेमिनार आणि रीट्रीटो
९. महासभा
१०. छापील साहित्य वाटप आणि पाठ पुरावा
११. शुभवर्तमान साहित्य मुद्रणालय : प्रकाशने
१२. सेंट पॉलस् मॅट्रीक्युलेशन स्कुल : गावातील इंग्रजी माध्यम हायस्कूल
१३. रवीवारी शब्बाथ शाळा : सकाळी १०.३० आणि सायंकाळी३ वाजता-रविवारी (चेपॉक, वेलाचेरी, बालाजी नगर आणि संतोषपुरम)
**१४. सकाळची उपासना : रविवारी सकाळी ५.३० वाजता**
**१५. सुरुवातीची उपासना : रविवारी सकाळी ८.०० वाजता**
**१६. तामिळ उपासना : रविवारी सकाळी ८.३० वाजता**
**१७. युवा सभा : रविवारी दुपारी ११.०० वाजता**
**१८. सहभाग भोजन : रविवारी दुपारी १.०० वाजता**
**१९. तेलगु उपासना : सायंकाळी ५ वाजता - रविवारी**
**२०. हिन्दी उपासना : सायंकाळी ४ वाजता - रविवारी**
**२१. तमिळ आणि इंग्रजी उपासना : सायंकाळी ६ वाजता - रविवारी**
२२. अभिप्रायाची वेळ : सायंकाळी ७.३० वाजता - रविवारी
२३. स्त्रियांची प्रार्थना : सायंकाळी ५.३० वाजता - बुधवारी
२४. पुरुषांची प्रार्थना : सायंकाळी ७ वाजता - शुक्रवारी
२५. शिष्यत्त्वाची सभा : सायंकाळी ६ वाजता - शनिवारी
२६. गृह प्रार्थना सभा : सायंकाळी ६.३० वाजता - मंगळवारी/गुरुवारी
२७. विशेष प्रभु भोजन : पहाटे ६ वाजता प्रत्येक महिन्याच्या १ल्या दिवशी
२८. सेवाकाची समालोचन सभा : सायंकाळी ५.३० वाजता - पहिला शनिवार
२९. पालकांची प्रार्थना : सायंकाळी ४ वाजता - पहिला रविवार
३०. रात्रभर प्रार्थना : सकाळी ९.३० वाजता - तिसऱ्या शुक्रवार
३१. उपवास प्रार्थना : सकाळी ९.३० वाजता - दुसऱ्या शनिवार
३२. पवित्र सहभागिता : दुसऱ्या रविवारच्या उपासनेत
३३. तरुण/तरुणी/लहान लेकरांसाठी प्रार्थना : दररोज रात्री १० वाजता (फोन द्वारा)
३४. कार्यालयीन स्टाफचे मनन : सकाळी ९ वाजता - दररोज
३५. कार्यालय : सकाळी ९ ते रात्री ९ पर्यंत (रविवार वगळून)

## एको ऑफ हिज कॉल

### टपाल द्वारे धर्म शास्त्राचे अभ्यासक्रम

### केवळ भारतातील उमेदवारां करीता

#### १) बायबलकोर

आम्ही नवीन ख्रिस्ती विश्वासणारे आणि अन्य विश्वासातील लोकांकरिता टपालाद्वारे बायबल मधील पायाभूत सत्यांवर इंग्रजीत ५७ पाने, हिन्दी ७६ पाने आणि तामीळमध्ये ९६ पानांचा अभ्यासक्रम देऊ करीत आहोत. तुम्हाला 'न्यु लाईफ फॉर यू' या शिर्षकाचे अभ्यासक्रमाचे पुस्तक देण्यात येईल! **अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर, तुम्हाला प्रमाणपत्र दिले जाईल. अभ्यासक्रमाकरिता आवश्यक अशी फी आकारली जाणार नाही. तुम्ही आशीर्वादित व्हाल!**

#### २) टपालाद्वारे ईश्वर विज्ञान आभ्यासक्रम

हा अभ्यासक्रम सुर्वानिक, ख्रिस्ती पुढारी आणि अरिक्षित सभासद ज्यांना देवाची सेवा करण्याची तीव्र इच्छा आहे, अशा करिता इंग्रजीत ५३७ पानांचा आणि तामिळ भाषेत ६५२ पानांचा अभ्यासक्रम उपलब्ध आहे. अभ्यासक्रमाची १००० रुपये फी आकारली जाते. त्यामध्ये १४९ अध्याय/पाठ समाविष्ट असलेली एकूण ७ पुस्तके देण्यात येतील. '**सर्टफिकेट इन मिनिस्ट्री**' प्रमाणपत्र देण्यात येईल. देव तुम्हाला आशीर्वाद देईल!

***अधीक माहिती करिता आम्हाला लिहा -***

अध्यक्ष - नहेम्या बाईबल कॉलेज
एको ऑफ हिज कॉल, पोस्ट बॉक्स नं. २१५७,
चिपॉक, चैन्नई - ६०० ००५
फोन : (०४४) २८५२ ८२८२, २८५२ १२१३,
फोन : ९८४१० ७१८५२, ९५६६१ ३१८५८
E-mail: biblecor@yahoo.co.in

## एको ऑफ हिज कॉल

### मासिक (विनामुल्य) मिळविण्याची उत्तम संधी

तुम्ही तुमच्या मित्रांचे/नातेवाईकांचे पत्ते आमच्याकडे पोस्टाद्वारे, पत्राद्वारे, ई.मेल, वॉटस् ॲप किंवा फोन द्वारे पाठविल्यास, आम्ही त्यांना त्यांच्या पत्त्यावर मासिक विनामुल्य पाठवित जाऊ.

## कर सवलत

**एको ऑफ हिज कॉल एज्युकेशनल ट्रस्ट**ला भारतातील कोणत्याहि एका व्यक्तिद्वारे किंवा संस्थाद्वारे देण्यात येणारी देणगी हि आयकर कायद्याच्या ८० जी कलमा अंतर्गत कर सवलतीस पात्र ठरते. कृपया आपली देणगी डी.डी./धनादेश/मनी आर्डर "**एको ऑफ हिज कॉल एज्युकेशनल ट्रस्ट**" च्या नावाने खालील तपशीलानुसार आम्हाला पाठवा

| | |
|---|---|
| **Account Name** | **: ECHO OF HIS CALL EDUCATIONAL TRUST** |
| **Account Number** | **: 1023 2923 805** |
| **Bank Name** | **: STATE BANK OF INDIA** |
| **Branch** | **: TRIPLICANE, CHENNAI - 600 005** |
| **IFSC Code** | **: SBIN 0000249** |
| **SWIFT Code** | **: SBI NIN BB 455** |




# खड्ड्यातून महालापर्यंत

## PIT TO PALACE

**''नाचणाऱ्याने हे ध्यानात आणावे !'' (मत्तय २४:१५)**

**(पास्टर एस. सॅम सेलवाराज यांच्या जीवनातील अनुभव)**



## मला धडा शिकवणारे विमान!

''जो लोभिष्ठ आत्म्याचा आहे तो झगडा उठवतो, परंतु जो यहोवाच्या ठायी आपला भरवसा ठेवतो तो पुष्ट केला जाईल'' - नीतिसूत्रे २८:२५.

१९७० च्या दशकात, माझा एक मित्र मला नाझरेथुपेट नावाच्या एका छोट्या गावात एका गरीब महिलेसाठी प्रार्थना करण्यासाठी घेऊन गेला जिला दुष्टात्म्याने पछाडले होते. ती अनेक आजारांनी ग्रस्त होती, जे डॉक्टरांना सुद्धा बरे करता आले नव्हते. संध्याकाळ असल्याने मी तिथेच राहिलो आणि रात्रभर तिच्यासाठी प्रार्थना केली. देवाने आमच्या प्रार्थना कृपेने ऐकल्या आणि तिला चमत्कारिक बरे केले.

दुसऱ्या दिवशी सकाळी मी ते गाव सोडले आणि माझ्याकडे असलेल्या तुटपुंज्या पैशांनी साधा नाश्ता केला. तेव्हाच मला कळले की घरी परतण्यासाठी माझ्याकडे बसचे भाडे नव्हते. माझ्या परिस्थितीचा कोणताही विचार न करता, माझ्याकडे असलेल्या सुवार्तेच्या पत्रिका घेऊन चालायला सुरुवात केली आणि रस्त्यावर ती लोकांना वाटू लागलो. काही वेळाने, भूक आणि थकवा यांनी मला ग्रासले.

तथापि, पवित्र आत्म्याने मला थेट घरी जाण्याची परवानगी दिली नाही. किंबहुना, त्याने मला पास्टर आबेद-नेगोकडे जाण्यास निर्देशित केले, जे तांबरममधील त्यांच्या लाईफ-वे या चर्चच्याद्वारे गरिबांमध्ये सेवा करीत होते. त्या वेळी, पास्टर आबेद-नेगो, दिवंगत ब्रदर इमॅन्युएल, चिदंबरम येथील लाईफ-वे ए सी ए चर्चचे पास्टर थॉमस आणि ब्रदर पोलिस - चेल्लादुराई (आता ते अमेरिकेत देवाचे प्रसिद्ध सेवक आहेत), उपवास प्रार्थना करीत होते.

प्रार्थना संपल्यावर, पास्टर अबे द-नेगो यांच्या पत्नीच्या लक्षात आले की मी उपाशी आहे आणि तिने प्रेमाने मला जेऊ घातले. दरम्यान ब्रदर पोलीस चेल्लादुराई, विमानतळावर त्यांच्या कर्तव्यावर पोहोचण्यास घाई करीत होते, व त्यांनी मला त्यांच्यासोबत येण्याचे आमंत्रण दिले. त्यांनी सांगितले की, ते मला विमानतळाच्या आत घेऊन जातील, जेणेकरून काही विमानांना मी जवळून पाहू शकेन. त्यांचा हेतू मला प्रोत्साहन देण्याचा होता, जेणेकरून मी सेवेच्या ओझ्यांमुळे दबून जाऊ नये आणि त्याऐवजी काहीतरी नवीन पाहण्यात मला आनंद मिळावा आणि माझे थकलेले मन ताजेतवाने व्हावे.

### विमान दुरुस्तीचे काम चालू आहे!

विमानतळावर मी एक विमान पाहिले, ज्यातून प्रवाशांना खाली उतरण्यास सांगण्यात आले होते, कारण त्यात तांत्रिक बिघाड झाला होता. काही मिनिटांतच तज्ञांना बोलावण्यात आले आणि त्यांनी समस्या सोडवण्याचा प्रयत्न केला, परंतु त्यांना ते शक्य झाले नाही. लवकरच इतर ठिकाणांहून अभियंते आणण्यात आले आणि त्यांनी विमानावर अथक परिश्रम घेतले. ते दुरुस्त व्हावे यासाठी त्यांनी किती चिकाटीने प्रयत्न केले हे पाहून मला आश्चर्य वाटले.

दरम्यान, वाट पाहणाऱ्या प्रवाशांचा धीर सुटला. ते मोठ्या आवाजात रागावून म्हणू लागले की, ते दुरुस्त करीत असलेल्या विमानातून प्रवास करणार नाहीत आणि त्याबद्दल ते अतिशय तुच्छतेने बोलू लागले.

तीन तासांच्या अथक प्रयत्नानंतर, अभियंत्यांनी अखेर विमान उड्डाणास योग्य असल्याचे सांगितले. कडक उन्हात वाट पाहत असलेले तरुण आणि वृद्ध प्रवासी विमानात चढू लागले. मीही त्यांच्यामध्ये उभा असताना, प्रवाशांनी मलाही चढण्याचा आग्रह केला तेव्हा मला आश्चर्य वाटले.

त्याच क्षणी, पवित्र आत्म्याने मला हलकेच सुचवले की, मी विमान कशाप्रकारे पुढे सरकते याचे निरीक्षण करावे. पूर्वी अनुपयुक्त समजलेले तेच विमान हळूहळू पुढे जाऊ लागले, नंतर धावपट्टीवर वेगाने धावू लागले. काही सेकंदातच, ते प्रचंड शक्तीने वेगवान झाले, वर उचलले गेले आणि लागलीच त्याने आकाशात उंच भरारी घेतली. जे विमान काही तासांपासून उड्डाणासाठी अपात्र समजले जात होते, त्याने अचानक पूर्ण शक्तीने आकाशात उड्डाण केले.

### आणि देव माझ्याशी बोलला!

''माझ्या मुला, सॅम, आज तुला कदाचित टाकून दिल्यासारखे, नाकारल्यासारखे आणि निरुपयोगी पात्रासारखे वाटत असेल. तरीही, तुझ्या ध्येयापर्यंत पोहोचण्यासाठी, तुला विश्वासाचा एक लांब पल्ला चालावे लागेल. दुरुस्ती अंतर्गत विमानासारखेच, तुलाही पुनर्स्थापित केले जावे आणि योग्य बनवले जावे. माझ्या नेमलेल्या वेळी, मी तुला

आशीर्वाद देईन. ज्याप्रमाणे ते विमान अनेक प्रवाश्यांना घेऊन गेले, त्याचप्रमाणे मी तुला अनेकांसाठी आशीर्वादाचे पात्र बनवीन. भिऊ नको, कारण मी तुझ्याबरोबर आहे.''

जवळजवळ २० किलोमीटर चालल्यानंतर मी माझ्या ठिकाणी परतलो. आज मी साक्ष देऊ शकतो की, त्या कठीण काळात प्रभूने मला सांगितलेले शब्द पूर्ण झाले आहेत.

प्रिय मित्रांनो, गरिबी, विरोध किंवा जीवनातील ओझ्यांमुळे तुम्ही कधीकधी थकून जाता का? भिऊ नका! कारण असे लिहिले आहे: **''आणि तुम्ही यहोवाचे याजक म्हणवले जाल; लोक तुम्हांस आमच्या देवाचे सेवक म्हणतील; तुम्ही राष्ट्रांचे धन खाल, आणि त्यांच्या गौरवात आपला मोठेपणा मिरवाल''** - यशया ६१:६.

*************

(पान ६ वरुन)

फक्त बियाणे पेरण्याशिवाय मालकाने काहीही केले नव्हते हे त्यांना मुळीच समजले नाही. आपल्यासाठी जे काही चांगले आहे तेच देव करीत असतो. जरी आपल्याला तसे वाटत नसले, तरी तो आपल्याला वरून येणाऱ्या देणग्या प्रदान करतो: **''प्रत्येक उत्तम दान व प्रत्येक पूर्ण दान वरून आहे; ज्याला पालट नाही व फिरण्याची छायाही नाही त्या प्रकाशाच्या बापापासून ते उतरते''** – याकोब १:१७.

घरधन्याचे उत्तर सोपे होते: ''त्यांना वाढू द्या.''



*घरधन्याचे प्रत्युत्तर- त्यांना वाढू द्या.*

कधीकधी आपल्याला असा प्रश्न पडतो की, जे लोक देवाला संतुष्ट नसलेले जीवन जगतात ते, देवाची त्यांच्या संपूर्ण हृदयाने, मनाने आणि आत्म्याने जे सेवा करतात त्यांच्यापेक्षा अधिक आशीर्वादित का दिसतात. मी देवाचे मूल असूनही इतके दुःख का भोगत असतो, मात्र इतर लोक जे अनैतिक जीवन जगतात ते माझ्यापेक्षा आनंदाने जीवन जगताना दिसतात, का? याचे उत्तर आहे, ''त्यांना वाढू द्या.''

देव दयाळू आहे. त्याची कृपा आपल्या कल्पनेच्या पलीकडची आहे. तो लोकांचे परिवर्तन होण्यासाठी त्यांना वेळ आणि संधी देतो. तो नीतिमान आणि अनीतिमान या दोघांनाही सूर्यप्रकाश देतो. पण एके दिवशी, सर्वकाही उघडकीस येईल – ''कापणीच्या वेळी.''

## ६. कापणीच्या वेळी!

जेव्हा चाकरांना गव्हातील निदण उपटायचे होते तेव्हा मालक म्हणाला, नाही. दोन्ही वाढत असताना, त्यांच्यामध्ये कोणताही स्पष्ट फरक दिसत नव्हता. तरीही आपण हे लक्षात ठेवले पाहिजे: गहू आणि निदण दोन्हीही कापणीला सामोरे जातील – न्यायाच्या दिवशी. आपण न्यायाच्या सिंहासनासमोर उभे असताना, तो फरक स्पष्टपणे उघड होईल. घरधन्याने जाहीर केले: **''कापणीपर्यंत दोन्ही बरोबर वाढू द्या, मग कापणीच्या वेळेस मी कापणाऱ्यांस सांगेन की पहिल्याने निदण जमा करा, व जाळण्यासाठी त्याच्या पेंढ्या बांधा, परंतु गहू माझ्या कोठारात साठवा''** – मत्तय १३:३०.

तर, आज आपण स्वतःला हा प्रश्न विचारला पाहिजे की, आपण कोणत्या पेंढ्यामध्ये सामील आहोत?

देव आपल्यावर इतके असीम प्रेम करतो की, त्याची इच्छा नाही की, तो कोणालाही त्या अनंतकालीन मृत्यूसाठी ठरलेल्या पेंढ्यामध्ये एकत्र गोळा करील, **व त्या विस्तवाच्या भट्टीत टाकील, जिथे रडणे आणि दात खाणे असेल** (मत्तय १३:४२). म्हणूनच, कालवरीच्या वधस्तंभावर आपली पापे, शाप, आजार, निराशा आणि जीवनातील रिकामेपणा आपल्या स्वतःवर घेण्यासाठी येशू ख्रिस्त जगात आला. तो आपल्यासाठी मेला. त्याने मृत्यूला चाखले; आणि मृत्यू त्याला रोखू शकला नाही म्हणून, तो तिसऱ्या दिवशी पुन्हा उठला आणि त्याने सिद्ध केले की, तो एका विजेत्यापेक्षाही सर्वश्रेष्ठ आहे.

त्याच्या अभिवचनाप्रमाणे, राजांचा राजा म्हणून जगाचा न्याय करण्यासाठी तो पुन्हा येईल. अनंतकाळाच्या शिक्षेपासून वाचण्याचा एकमेव मार्ग म्हणजे, येशू ख्रिस्ताला आपला तारणहार म्हणून स्वीकारणे, त्याला आपल्या जीवनाचा प्रभू म्हणून घोषित करणे आणि सर्वस्वी त्याला समर्पित होणे. केवळ हाच एक मार्ग आहे.

**पवित्र शास्त्र सांगते: ''तेव्हा न्यायी आपल्या बापाच्या राज्यात सूर्यासारखे प्रकाशतील. ज्याला ऐकायला कान आहेत तो ऐको''** – मत्तय १३:४३.

आपण देवासाठी चमकावे अशी देवाची इच्छा आहे.

खरा प्रश्न हा आहे की, आपण त्याच्यासाठी चमकण्यास तयार आहोत का? आपण गहू आहोत की निदण? आपण जागे आहोत की झोपलेले आहोत?

*************

## सूचना

कृपया आमचे मोबाईल क्रमांक (+९१) ९८४१० ७१८५८, (+९१) ९८४१२७१८५८ (मुख्य क्रमांक) आपल्या मोबाईल फोनमध्ये जतन करून ठेवा.

– संपादक

Posted at "Egmore RMS Patrika Channel" RNI NO. 70106/98, Postal Regn. No. TN/CH/(C)/206/24-26 WPP NO. TN/PMG(CCR)/WPP-261/24-26

## Echo of His Call

**YouTube**
Please subscribe

Kindly view and subscribe our **Echo of His Call YouTube Channel** when you get time. Thanks.

- Editor

## OUR BANK DETAILS:

***1. Bank : State Bank of India***

Branch : **Triplicane, Chennai-5**
Name : **S. Sam Selva Raj**
A/C No. : **1023 2934 679**
IFSC : **SBIN 00 00 249**
SWIFT CODE : **SBI NIN BB 455**

***2. Bank : ICICI Bank***

Branch : **Anna Salai, Chennai-6**
Name : **Echo of His Call**
A/C No. : **6038 0502 2319**
IFSC : ICIC 000 6038

***3. Bank : State Bank of India***

**(This Account is for Tax Exemption for Indians only )**

Branch : **Triplicane, Chennai-5**
Name : **Echo of His Call Educational Trust**
A/C No. : **1023 2923 805**
IFSC : **SBIN 00 00 249**

**Google Pay: 98410 71858**
**PayPal : SAM SELVA RAJ**
*****
**E.mail : sam@echoofhiscall.org**

# ECHO OF HIS CALL

१७ भाषेत मासिक, बायबल कॉलेज पत्रव्यवहाराद्वारे अभ्यासक्रम मंडळी रोपन कार्य, गावात इंग्रजी माध्यम शाळा, शुभवर्तमान साहित्य मुद्रणालय, महासभा, शिबीर, सामाजिक सेवा इत्यादि.

**वार्षिक वर्गणी : रूपये १००/-    आजीवन वर्गणी : रूपये २०००/-**

एको ऑफ हिज कॉल मिनिस्ट्रीजची विविध सेवा कार्ये तुमच्यासारख्या स्वेच्छा दान आणि देणग्या देणाऱ्या देवाच्या लेकरांनी दिलेल्या आधाराद्वारे करण्यात येतात. या सेवाकार्याकरिता देव तुम्हाला सुचवेल तशा प्रकारे तुम्ही आधार देवू शकता. शुभवर्तमान न पोहंचलेल्या लोकांपर्यंत ते नेण्याकरिता व मंडळ्या रोपन कार्याकरिता आम्हांला तुमच्या मदतीची गरज आहे.

एको ऑफ हिज कॉल मासिक तुम्हांला नित्य नियमाने मिळावे अशी तुमची इच्छा असेल तर कृपया आम्हाला लिहून कळवा. तुमचा पोस्टाचा किंवा ई-मेलचा पत्ता बदलला असेल तर कृपया जुना व नवा पत्ता आम्हांला कळवा.

आमच्या वेब साईटवर देखील १७ भाषेतील मासिक उपलब्ध आहे. तुम्ही साईट वर जाऊन ते वाचू सकता व डाउन लोड देखील करून आशीर्वादित होऊ शकता.

Your letters, prayer requests and your financial helps **(Money Orders, Cheques or Demand Drafts, NEFT, PayPal (Sam Selva Raj, sam@echoofhiscall.org) PhonePe (98410 71858), Gpay (98410 71858), Western Union, MoneyGram, etc.)** to **ECHO OF HIS CALL** may please be sent to the address below.

आम्हांला आमची यादि अद्यावत करण्याकरिता कृपया तुमचा घरचा फोन मोबाईल फोन क्रमांक आणि ई.मेल कळवा.

Our address :

**ECHO OF HIS CALL**
10, MOHAMMED ABDULLAH 2ND STREET, CHEPAUK, CHENNAI - 600 005, INDIA
PH: (+91-44) 2852 8282, 2852 9293, 2854 7766/ Cell: (+91) 98410 71852, 95661 31858 / E.mails: sam@echoofhiscall.org / biblecor@yahoo.co.in
Websites: www.echoofhiscall.org / www.stpaulsmatriculation.org

**YOU CAN SEND YOUR DONATIONS BY ONLINE ALSO**

RNI NO. 70106/98
Postal Regn. No. :TN/CH/(C)/206/24-26
WPP NO. TN/PMG(CCR)/WPP- 261/24-26
Date of Publication: Second week of every month
Date of Posting : 11th & 12th of every month
Posted at "Egmore RMS Patrika Channel"
on 12th NOVEMBER 2025.
If un-delivered please return to:
**ECHO OF HIS CALL (MARATHI)**
P.O. Box No. 2957,
Chepauk, Chennai - 600 005, INDIA.
Phone: (+ 91- 44) 2852 8282, 2852 9293, 2854 7766

***JESUS LOVES YOU!***

To

*GOD BLESS YOU!*

Owned and published by **S. Sam Selva Raj** from New No. 8 & 10, Old No.18 & 19, Mohammed Abdullah 2nd Street, Chepauk, Chennai-600 005 and printed by **S. Sam Selva Raj** at **Echo of His Call Printers,** New No. 8 & 10, Old No.18 & 19, Mohammed Abdullah 2nd Street, Chepauk, Chennai-600 005. Editor: **S. Sam Selva Raj.**